# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, ४०१ १०१.**
**दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.**


**जा.क्र.मनपा/आस्था/3481/२०२१-२२** **दि.23/02/२०२२**

वाचले

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अकंपा-१०९३-२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २६ ऑक्टोबर १९९४.

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ दिनांक : २१ सप्टेंबर २०१७

३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : अकंपा-१२१९/प्र.क्र.५६/आठ दिनांक : ११ सप्टेंबर २०१९

४) शासन निर्णय शुध्दीपत्रक वित्त विभाग क्रमांक. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दिनांक : ३० जुलै, २०२०

५) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. एमसीओ-२०१९/प्र.क्र.११७/नवि-१४ दिनांक : ११ जुलै, २०१९

६) श्री. मितुल प्रमोद पाटील यांचा दि. ०५/०७/२०२१ रोजीचा अर्ज.

७) मा. जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचेकडील OPD-८३२, दि.१३/०१/२०२२ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्र.

८) उपायुक्त पोलीस, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकडील No. SB/T-10/VERI/PVTJOB/017360/2022, दि. 17/01/2022 रोजीचे चारित्र्य पडताळणी पत्र.

९) मा. आयुक्त सो. यांची दि. 24/12/2021 रोजीची मान्यता

---

विषय :- <u>अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबत</u>
श्री. मितुल प्रमोद पाटील

आदेश,

कै. प्रमोद मोरेश्वर पाटील हे मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर लिपीक या पदावर काम करीत होते. त्यांचे दि. २६/१२/२०२० रोजी निधन झाले. सबब त्यांच्या जागेवर अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेसाठी त्यांचा मुलगा श्री. मितुल प्रमोद पाटील यांनी दिनांक ०५/०७/२०२१ रोजी अर्ज सादर करून त्या अनुषंगाने नियुक्तीसाठी आवश्यक ती कागदपत्रे व प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्यांचा पूर्व चारित्र्य व वर्तणूक पडताळणी अहवाल पोलीस उपायुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकडील No. SB/T-10/VERI/PVTJOB/017360/2022, दि. 17/01/2022 अन्वये प्राप्त झाला असून तो अनुकूल आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी मा. जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचेकडील OPD-८३२, दि.१३/०१/२०२२ अन्वये त्यांचा वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त झाला असून तो अनुकूल आहे.

श्री. मितुल प्रमोद पाटील यांनी सादर केलेली कागदपत्रे तसेच शासन निर्णय १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अकंपा-१०९३-२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दिनांक २६ ऑक्टोबर १९९४. २) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ दिनांक : २१ सप्टेंबर २०१७. ३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : अकंपा-१२१९/प्र.क्र.५६/आठ दिनांक : ११ सप्टेंबर २०१९. ४) शासन निर्णय शुध्दीपत्रक वित्त विभाग क्रमांक. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दिनांक : ३० जुलै, २०२०. ५) शासन निर्णय नगर तिकास विभाग क्र. एमसीओ-२०१९/प्र.क्र.११७/नवि-१४ दिनांक : ११ जुलै, २०१९ च्या शासन परिपत्रकातील तरतुदीस तसेच बिंदुनामावली तपासणीच्या अधिन राहून श्री. मितुल प्रमोद पाटील यांना अनुकंपा तत्वावर मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर "शिपाई" या पदावर (इ.मा.व.) या प्रवर्गातून सेवेत हजर झाल्याच्या तारखेपासून प्रथमतः एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी पे लेवल S-1 15000-47600 या वेतनश्रेणीत पूर्णता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

श्री. मितुल प्रमोद पाटील यांना निःसंदिग्धपणे समज देण्यात येते की, त्यांची मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर "शिपाई" या पदावर करण्यात आलेली नियुक्ती ही खालील अटी व शर्तीवर करण्यात आली असून, सेवा कालावधीत या अटी व शर्ती त्यांचेवर बंधनकारक राहतील.

अटी व शर्ती :-

१. सदरची नियुक्ती ही रुजू तारखेपासून प्रथमतः एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी करण्यात येत आहे.

२. परिविक्षाधीन कालावधीन त्यांचे कामकाज असमाधानकारक आढळल्यास विनापरवाना गैरहजर राहिल्यास, गैरवर्तणूक आढळल्यास, नेमून दिलेल्या कामात टाळाटाळ केल्यास, उद्धटपणाची वर्तणूक केल्यास, कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता केव्हाही कामावरून कमी केले जाईल.

३. सदरची नियुक्ती ही त्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता, तांत्रिक पात्रता, जातीविषयक दाखल्याच्या सत्यप्रती पाहून तसेच वारसाबाबत सादर केलेली कागदपत्रे पाहून दिलेली आहे. त्यामध्ये व मूळ दाखल्यामध्ये वा प्रतिज्ञापत्राच्या वस्तुस्थितीमध्ये तफावत आढळल्यास त्यांना सेवेतून कमी केले जाईल.

४. महापालिका सेवेत हजर होताना शैक्षणिक अर्हता, तांत्रिक पात्रता, जातीविषयक, शाळा सोडल्याबाबत वयाचे व इतर दाखले (ओरिजिनल सर्टिफिकेट) आणावेत त्याशिवाय हजर करून घेतले जाणार नाही.

५. महापालिका सेवेत हजर होताना नव्याने काढलेल्या आपल्या छायाचित्राच्या (फोटोच्या) शासकीय राजपत्रित अधिकाऱ्याने/नोटरी यांनी प्रमाणित केलेल्या दोन प्रती सादर कराव्या लागतील त्याशिवाय हजर करून घेतले जाणार नाही.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, ४०१ १०१.**
**दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.**


**जा.क्र.मनपा/आस्था/3481 /२०२१-२२** **दि.23/02/२०२२**

६. नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत महानगरपालिकेच्या प्रशासन विभागात हजर व्हावे लागेल. मुदतीत हजर न झाल्यास आपणांस नोकरीची आवश्यकता नाही. असे गृहित धरून सदरची नियुक्ती रद्द करण्यात येईल व मुदतीनंतर कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७. आपण दिलेली माहिती खोटी आहे असे निदर्शनास आल्यास व तशी खात्री झाल्यास कोणत्याही प्रकारची चौकशी न करता अथवा नोटीस न देता महापालिका सेवेतून त्वरीत कमी केले जाईल व त्याबाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

८. महापालिकेने स्वीकारलेले सेवानियम अथवा सेवानियमाबाबत केलेले उपविधी किंवा सध्या अस्तित्वात असलेले सेवानियम किंवा भविष्यकाळात तयार होणारे नियम आपल्यावर बंधनकारक राहतील.

९. महापालिका सेवा सोडण्यापूर्वी रीतसर एक महिना आगाऊ लेखी नोटीस मा. आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे नावे द्यावी लागेल. लेखी नोटीस न दिल्यास एक महिन्याच्या वेतना इतकी रक्कम महापालिका कोषागारात रोख भरावी लागेल. त्या शिवाय दिलेला राजीनामा मंजूर केला जाणार नाही. त्याचप्रमाणे महापालिकेचे इतर येणे असल्यास ते रोख भरावे लागेल.

१०.शासन निर्णय क्र.अ) अंनियो/१००५/१२६/सेवा-८, दि. ३१ ऑक्टोबर २००५ ब) अंनियो/१००७/१८/सेवा-४, दि.१७ जुलै २००७ क) अंनियो/२०१२/प्र.क्र.२६/सेवा-४, दि.२१ ऑगस्ट २०१४ या निर्णयानुसार नवीन (परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना) राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

११.शासन परिपत्रक क्रमांक सीडीआर-१०१०/प्र.क्र.२४/पुनर्वाधणी७०/११ दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ नुसार भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ घ्यावी लागेल.

१२.पदावरील हजर झाल्याची तारीख सेवाज्येष्ठतेकरिता धरण्यात येईल.

१३.नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६(सहा) महिन्याच्या आत इ.मा.व. गटातील जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१४.महाराष्ट्र शासन परिपत्रक जा.क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.०१/०७/२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नियम-२००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ या आज्ञापत्रका सोबत जोडला आहे. तो उमेदवाराने नेमणुकीच्या खात्याकडे रुजू होताना भरून देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास संबंधित खात्याने हजर करून घेवू नये.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

मारुती गायकवाड
उपायुक्त (मु.)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रति,
श्री. मितुल प्रमोद पाटील
रा. सी/२०२, वालचंद नगर,
बिल्डींग नं.१, शिवसेना शाखे समोर,
राईगांव, भाईंदर (प.) ठाणे ४०११०१

14/03/22

प्रत :-

१) मुख्य लेखाधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका
२) मुख्य लेखापरीक्षक, मिरा-भाईंदर महानगरपालिका
३) आस्थापना अधिक्षक, मिरा-भाईंदर महानगरपालिका
४) निवड नस्ती, मिरा-भाईंदर महानगरपालिका

टीप : सदर कर्मचाऱ्याचा परिविक्षाधीन कालावधी संपण्यापूर्वी पंधरा दिवस अगोदर त्यांचा कामकाज अहवाल पुढील नियुक्तीबाबत स्वयंस्पष्ट शिफारशीने पाठविण्याची दक्षता घ्यावी.